**पोलीस कोठडीत घडणाऱ्या मृत्यूच्या/आत्महत्येच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

परिपत्रक क्रमांक-एचआरसी-०१०८/प्र.क्र. १३१/पोल- १४,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक - १५ जुलै, २००८

वाचा :- १) शासन परिपत्रक, गृह विभाग, क्रमांक -एमयुआर-०७९०/सीआर-१५८/पोल-११ दिनांक २२ नोव्हेंबर, १९९०

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक ( इंग्रजी) क्रमांक-डीजीपी-२३/कोर्ट केसेस/९७, दिनांक ११.४.१९९७

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक- पोमसं /४२ अ / मा.ह.आ. / परिपत्रक /२००४ /१०२, दिनांक २२.१.२००४

पोलीस कोठडीतील पोलीसांच्या ताब्यातील आरोपींची देखभाल, पोलीस कोठडीमध्ये मृत्यु होऊ नये यासाठी करावयाच्या विविध उपाययोजना व घ्यावयाची दक्षता तसेच, पोलीस कोठडीमध्ये मृत्यु पावलेल्या कैदयांची प्रकरणे हाताळण्यासंदर्भात अवलंबावयाची कार्यपध्दती इत्यादी संदर्भात शासन तसेच पोलीस महासंचालक यांनी वर नमूद केलेल्या विविध परिपत्रकान्वये वेळोवेळी विस्तृत सूचना निर्गमित केल्या आहेत. तथापि, पोलीस कोठडीत आरोपींनी आत्महत्या करण्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. पोलीस कोठडीतील मृत्यू ही अतिशय गंभीर बाब असल्यामुळे राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व सर्वोच्च न्यायालयाकडून याची वेळोवेळी गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे व त्याअनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत सूचनाही वेळोवेळी निर्गमित करण्यात आल्या आहेत.

वरील प्रमाणे शासन व पोलीस महासंचालक यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांची अंमलबजावणी संबंधितांकडून योग्य प्रकारे केली जात नसल्यामुळे तसेच, वरिष्ठांकडून देखील याचे संनियंत्रण योग्य प्रकारे केले जात नसल्यामुळे अशी प्रकरणे उद्‌भवत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तरी सर्व संबंधितांनी नमूद परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच, सदर मार्गदर्शक सूचनानुसार आवश्यक त्या उपाययोजना / दक्षता संबधीतांकडून घेतली जात आहे किंवा कसे, याचा आढावा जिल्हयातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घ्यावा. अशा घटना सबंधीतांच्या निष्काळजीपणामुळे वा उचित उपाययोजना न केल्यामुळे घडल्या असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित घटक प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- ८८
२ - 6 AUG 2008
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-
म. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( रु. न. देशमुख )

सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व पोलीस आयुक्त,

सर्व जिल्हा दंडाधिकारी

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,

सर्व पोलीस अधिक्षक,

सर्व कारागृह अधिक्षक,